

# ग्रंथ पुरस्कार : अपारंपरिक

मनोगत

**सतीश काळसेकर**

'वाचणाऱ्याची रोजनिशी' हे पुस्तकांविषयीचे पुस्तक आहे. ही ग्रंथसंग्रहाची, ग्रंथवाचकाची रोजनिशी आहे. आपल्या वाचनात जे आले ते इतरांनीही वाचावे अशा तळमळीतून या पुस्तकातील लेखन झाले आहे. विविध मराठी, हिंदी, इंग्रजी ग्रंथांचा परिचय यातून होतो. यात ग्रंथसंग्रहाविषयी लिहिले आहे, तसेच ग्रंथांचे संपादन, प्रकाशन, मुद्रण याविषयीही लिहिले आहे. पुस्तकांविषयी लिहिताना काळसेकरांनी अवतीभवतीच्या परिस्थितीचे, समाजाचे, राजकीय-आर्थिक स्थितीचे, जगाच्या समकालीन अवस्थेचे संदर्भही दिले आहेत. कविता, कादंबरी, कथा, लेख, चरित्र, आत्मचरित्र, गौरवग्रंथ, संदर्भग्रंथ, प्रवासवर्णन, मुलाखती, भाषणे, समीक्षा असा हा वाचनाचा पसारा आहे. संतवाङ्मय, इतिहास, विज्ञान, चित्रकला, शिल्पकला, संगीत, नाटक, चित्रपट या सर्व विषयांचा आवाका यात आहे. त्यामुळे का वाचावे, काय वाचावे, कसे वाचावे या संदर्भात वाटाड्याचे काम करणारे हे पुस्तक आहे. थोडक्यात वाचनसंस्कृतीचा विकास व विस्तार करण्यासाठी प्रेरणा देणारे हे पुस्तक आहे...

# लिहिणारे हात आता परिघावर आहेत

**मराठी साहित्याचा भूगोल गेल्या अर्धशतकात लक्षात यावा इतका रंगरूपाने पालटला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातले– विशेषत: तळागाळाच्या बहुजन समाजापर्यंत पोहोचलेले शिक्षण आता गावाच्या सीमा ओलांडून आधी गावगाड्याआतून, गावगाड्याबाहेर आणि आता तर भटक्या तांड्यापासून आदिवासी तांड्यापर्यंत पोहोचले आहे. सगळे अगदी ठीकठाक आहे असे म्हणता येणार नाही. पण बदल नोंदवले जातील इतके ते सशक्त आणि सुस्पष्ट नक्कीच आहेत. प्रमाण मराठी साहित्यव्यवहार आणि प्रमाण मराठी साहित्यव्यवहारातला अभिजनांचा दाब आणि धाक आता पूर्वीइतका अदृश्य रूपातही बळकट नाही. या वास्तवाची नोंद आपण घ्यायलाच हवी. लिहिणारे हात आता परिघावर आहेत, केंद्रे डळमळीत झाली आहेत.**

'सांगावे सांगावे। आणि हलके करावे स्वत:ला' या माझ्या 'खूप बाकी आहे अजून' या कवितेतल्या ओळी आहेत. हा माझा सगळ्या लेखनाला जोडणारा धागा आहे. हे सांगणे प्रथमत: स्वत:साठी असते आणि नंतर आपल्या भवतालासाठीही असते. काही चांगले वाचले, पाहिले, ऐकले तर त्यातून मिळणारा आनंद इतरांसोबत वाटून घ्यावा. हे माझ्याबाबतीत नेहमीच घडत आले आहे. प्रसंगी ते मित्रांसोबत करतच होतो. अगदी रात्री-बेरात्री दूरध्वनीवरून त्यांना जागे करून मी ते केले आहे. पण याला जवळच्या मित्रांची मर्यादा होती. 'आपले वाङ्मयवृत्त' आणि नंतर 'साप्ताहिक साधना'च्या निमित्ताने तशी संधी आली आणि तिचा उपयोग करून घेतला. 'वाचणाऱ्याची रोजनिशी' आज आपल्यासमोर एकत्रित ग्रंथरूपात आली आहे, ती या प्रेरणेतून लिहिलेल्या दर महिन्याच्या सदरातून. ते सदर दीर्घकाळ चालू ठेवण्याची संधी मला दिली त्यासाठी 'आपले वाङ्मयवृत्त'चे प्रकाशक आणि 'साधना'चे संपादक यांचे आभार मानायलाच हवेत. याही आधी मी सदर लेखनाचा अनुभव घेतला होता; 'अत्त दीप भव' (वृत्तमानस). त्याही लेखनापाठी हाच धागा होता. पण माझ्यातला उत्साह सांगून झाल्यावर संपत होता आणि त्या सदर लेखनाला एकत्र करण्याचे राहून जात होते. या सदर लेखनाच्या बाबतीत तसे झाले नाही याचे श्रेय लोकवाङ्मय गृहातल्या मित्रांचे आहे. त्यांच्या श्रमाला अभिवादन. अर्थात ही पहिली आणि तात्कालीक प्रेरणा सांगून स्वत:ला हलके करायची असली तरी दीर्घकाल पाठपुरावा करणारी प्रेरणा आहे ती माझे आवडते आणि भारतीय भाषांतील आधुनिक काळातील महत्त्वाचे कवी गजानन माधव मुक्तिबोध यांच्या शब्दांत अधिक नेमकेपणाने सांगता येईल. त्यांची ओळ आहे : 'इसलिए की जो हैं, उससे बेहत्तर चाहिए।' मी साठोत्तरी पिढीतला लिहिणारा कवी आहे. आणि त्या काळात आमच्यासमोर मुख्य प्रवाहातला जो साहित्यव्यवहार होता, त्या व्यवहारातून पुढे येणारे अनुभवविश्व आम्हाला रूचत नव्हते. पटत नव्हते. 'जगणं' आणि 'लिहिणं' यातील अंतर पुसत न्यावे. शक्य झाल्यास मिटवूनच टाकावे असे काहीसे वाटत होते आणि तसा प्रयत्न करताना केंद्रस्थानी असलेला साहित्यव्यवहार, त्या व्यवहाराचा बहुजनांवरचा दाब, अभिजनांची प्रमाण मराठीतील सगळी हालचाल याची एक चीड, संताप, राग आम्हा मित्रांत खदखदत होता. त्यातून आम्ही त्या काळातील प्रस्थापित व्यवस्थेवर आमच्या साधनांनी मुख्यत: अनियतकालिकांनी किंवा लघुपत्रिकांनी लढा दिला. वाङ्मयीन जगतातल्या अभिजनांच्या

अधिमान्यतेला धक्का दिला. आजचा दलित साहित्याचा प्रवाह आणि बहुजनांतील अनेकांच्या साहित्यकृती यांचा त्यात उगम आहे. आता ही प्रेरणा दीर्घकाळची आणि काळानुरूप, समाजानुरूप बदलत जाणाऱ्या बदलांच्या स्वीकाराची, नकाराची अशी खूप गुंतागुंतीची आहे. 'वाचणाऱ्याची रोजनिशी' ही त्यातूनच पुढे आलेली कृती आहे. इथे काहींचे सूचन आहे. काही अधोरेखित केले आहे. काही बऱ्या-वाईटाचे आपणा सर्वांच्या सोबतीने केलेले मूल्यमापन आहे. पण एकूणात प्रेरणा मात्र जे आहे त्याविषयीचे असमाधान आणि एका नव्या सुंदर जगाचे स्वप्न त्यात गुंफण्याचा प्रयत्न आहे. म्हणजे यात फक्त काय वाचले इतकेच नाही तर का वाचले, कसे वाचले, त्यातून काय सापडले हे आपणापर्यंत आणण्याचा प्रयत्न आहे.

वाचन हे माझे व्यसन आहे. त्या व्यसनाची पहिली पायरी ग्रंथालयाच्या कपाटातून ग्रंथ वाचून चढता आली, पण दुसरी पायरी त्या व्यसनाचा सर्वार्थाने कडेलोट व्हावा अशी असते आणि ती असते ग्रंथसंग्रहाची. तर पहिल्या माथ्यावर छत नसलेल्या हलाखीच्या दिवसात कधी शाळा-कॉलेजच्या ग्रंथालयातून, कधी सार्वजनिक ग्रंथालयांतून, कधी मित्रांकडून उधार-उसनवारी करत या व्यसनाला सांभाळले आणि नंतर मात्र थांबलोच नाही. पगार 'होणार' म्हणून आधी ग्रंथ घ्या, पगार झाल्यावर 'मिळाला' म्हणून घ्या असा ग्रंथ घेतच राहिलो. त्याचा बळी मी आजही आहे. माझ्या ग्रंथसंग्रहासोबत मी वारुळातल्या सापासारखा निवांत असतो. ग्रंथ हाताशी, सभोवती नसतील तर माझी घुसमट होते. मी पुस्तकाशिवाय, वाचनाशिवाय हिमालयातल्या तापदायी प्रवासातही नसतो. तर आपले हे व्यसन इतरांपर्यंत पोहोचवावे. त्या व्यसनाचे फायदे सांगावेत. त्यातल्या निसरड्या जागा सांगाव्यात. त्याच्या व्यवस्थापनाच्या, जतनाच्या युक्त्या सांगाव्यात हीही एक प्रेरणा आधीच्या प्रेरणेत विरघळून गेली आणि त्या सगळ्यांतून 'वाचणाऱ्याची रोजनिशी' मी लिहीत राहिलो.

मराठी साहित्याचा भूगोल गेल्या अर्धशतकात लक्षात यावा इतका रंगरूपाने पालटला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातले- विशेषत: तळागाळाच्या बहुजन समाजापर्यंत पोहोचलेले शिक्षण आता गावाच्या सीमा ओलांडून आधी गावगाड्याआतून, गावगाड्याबाहेर आणि आता तर भटक्या तांड्यापासून आदिवासी तांड्यापर्यंत पोहोचले आहे. सगळे अगदी ठीकठाक आहे असे म्हणता येणार नाही. पण बदल नोंदवले जातील इतके ते सशक्त आणि सुस्पष्ट नक्कीच आहेत. प्रमाण मराठी साहित्यव्यवहार आणि प्रमाण मराठी साहित्यव्यवहारातला अभिजनांचा दाब आणि धाक आता पूर्वीइतका अदृश्य रूपातही बळकट नाही. या वास्तवाची नोंद आपण घ्यायलाच हवी. लिहिणारे हात आता परिघावर आहेत, केंद्रे डळमळीत झाली आहेत. 'वाचणाऱ्याची रोजनिशी'त या सगळ्याचा विचार मराठीच्या पातळीवर, प्रसंगी देशाच्या पातळीवर आणि प्रसंगवशात आजच्या जागतिकीकरणाच्या रगाड्यात जगाच्या पातळीवर जाऊनही करण्याचा प्रयत्न केला आहे.

आणि हे सगळे करत असताना आपणातली आणि माझ्यातली दरी संवादाच्या पातळीवर नेत मिटवून टाकावी अशा अंगाने आपणा सर्वांना हा संवाद संबोधित केला आहे.

आधी सूचित केल्याप्रमाणे मराठीत आज घडीला लिहिणारे असंख्य साहित्यकार त्यांच्यातील ऊर्जेचा उत्सव साजरा करत आहेत. त्या उत्सवात काही अधिक-उणे, आवडीचे-नावडीचे, मोलाचे-कमी मोलाचे असे घडतच राहणार. त्यातल्या ऊर्जेचे स्फोट नेहमीच संयत असतील असे मानण्याचे कारण नाही. केंद्राकडून परिघाकडे सरकणारा साहित्यव्यवहार हाही माणसाच्या आजच्या आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय व्यवहाराचा एक भाग आहे. साहित्य निर्वात पोकळीत जन्म घेत नाही. त्याला जगण्याच्या गुंतागुंतीच्या व्यवहाराचे सुगंध आणि दुर्गंध चिकटून असणारच. भाषेची आणि भाषेतून व्यक्त होणाऱ्या साहित्याची अभिजातता, विशुद्धता आणि अनुभवांची संपृक्तता पूर्वीसारखी एकजिनसी आणि प्रमाण केंद्रवर्ती अधिमान्यतेसाठी आता थांबणार नाही. या समाज आणि साहित्यव्यवहाराच्या वास्तवाचे स्वागत करावे की उपहास आणि अवहेलना हा वाद-प्रतिवादाचा मुद्दा आहे. माझ्यासाठी मात्र हे वास्तव स्वागतार्ह आहे. त्यातून निर्माण होणारे साहित्यशास्त्रीय धोके पत्करूनही ते स्वकारावे अशी माझी भूमिका आहे. साहित्यव्यवहाराचा दाब मात्र आजही केंद्रस्थानाच्याच जवळच्या प्रदेशात आहे हेही नाकारता येणार नाही. माझी भूमिका, बांधिलकी परिघाला विस्तारत आणि छेदत जाणाऱ्या, बोलीभाषांचा वापर करणाऱ्या मानवी समूहांशी आहे आणि तशी ती असल्याने त्यांच्याशी व वाद-प्रतिवाद-संवाद यावर विश्वास असल्याने आपणा सर्वांशी आहे.

आमेन.

**सतीश काळसेकर**
कबीरा, चित्रकुटी कलाग्राऊंड,
मु.पो. आंबेघर, ता.पेण, जि. रायगड.
मोबा. ९४२२६८९५५९

ओळख

**अरुण गो. कुलकर्णी**

# बौद्धिक निर्वाहाची रोजंदारी

कविवर्य सतीश काळसेकर हे मराठी कवितेतील एक महत्त्वाचे नाव. 'इंद्रियोपनिषद' (१९७१), 'साक्षात' (१९८२) व 'विलंबित' (१९९७) अशा तीन कवितासंग्रहांद्वारे ते वाचकांच्या भेटीला आले. साधारणत: ४५ वर्षांच्या दीर्घ कालखंडात फक्त तीन कविता संग्रह! वारेमाप संग्रह काढून संपून जाण्यापेक्षा मूल्यांना जपतजपत मोजकं लिहिणं नि निखळ वाङ्मयाच्या 'अपूर्णत्व' या मूलभूत संकल्पनेशी निष्ठा बाळगणं हा त्यांचा स्थायिभाव.

प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध दंड ठोकून उभ्या राहिलेल्या व पुढे स्वत:ची स्वतंत्र वाट काढत पर्यायी मार्ग ठरलेल्या अनियतकालिकांच्या चळवळीतले सतीश काळसेकर हे सुद्धा एक पथिक. शिवाय डाव्या विचारसरणीशी बांधिलकी मानणाऱ्या चळवळीतले एक पाईक. या घुसळणीतून त्यांच्या कवितेनं साडेतीन तपांचा प्रवास केलाय.

परिवलनाबरोबरच परिभ्रमण करत राहणं ही सतीश काळेसकरांच्या जगण्यासाठीची आणखी एक निकड. बँकेत नोकरी करत असताना तारेवरची कसरत करत मोहिमेवर निघणं ही आवड त्यांनी जोपासलेली. यातून त्यांनी भारतभर भ्रमंती केलेली. जम्मू-काश्मिर ते तिकडे पार पूर्वोत्तर राज्यापर्यंतचा अख्खा हिमालय त्यांनी पालथा घातलाय. या साऱ्या प्रवासातले त्यांचे अनुभव 'अत्त दीप भव' या वृत्तपत्रीय स्तंभातून त्यांनी प्रकट केलेले आहेत. जेथे जेथे ते ते गेले तिथल्या निसर्गाबरोबर ते एकरूप झालेच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे तिथल्या माणसांबरोबर त्यांनी साधलेला संवाद; तिथल्या माणसांची जाणून घेतलेली सुखदु:खं. हे माणुसपणाचे ऋणानुबंधच आयुष्यातला जिवंतपणा वृद्धिंगत करतात. अखेरच्या श्वासापर्यंत धनानुबंध ठरतात. कधीकाळचं त्यांचं हे विखुरलेलं स्तंभलिखाण पुस्तकरूपानं उपलब्ध झाल्यास वाचकांसाठी तो एक नवा अनुभव ठरेल.

माणसांमधला वास, प्रवासाचा ध्यास नि त्याचबरोबर वाचनाचा हव्यास यांतून वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व घडत जातं. मग अनुभवांच्या पाझरण्यातून जे कागदावर उतरत जातं ते पक्कं असतं. या परिपक्वतेमध्ये मग पक्क्या शाईबरोबर अक्षरंसुद्धा पक्कीच असतात. कविवर्य काळसेकरांच्या लिखाणात हाच ठळक ठसा वाचकांना अनुभवता येतो. मग त्यांचं ते पद्य असो, वा गद्य.

सतीश काळसेकरांना वाचनाची प्रचंड भूक आहे. त्यांच्या नव्या ग्रंथवाचनाच्या नाना कळा व्यक्त करणारी 'वाचणाऱ्याची रोजनिशी' ही डायरी लोकवाङ्मयगृहानं पुस्तकरूपानं आपल्या समोर आणलीय. 'आपले



वाङ्मयवृत्त'ची साडेपाच वर्ष आणि 'साप्ताहिक साधना'तील तीन वर्षं अशा एकूण साडेआठ वर्षांपैकी डिसेंबर ०३ ते जानेवारी ०९ या ६२ महिन्यांच्या ६० नोंदी या रोजनिशीत आहेत.

जमाखर्चाचा हिशेब मांडणारी प्रत्येकाची एक उदरनिर्वाहाची दैनंदिनी असते. ती वैयक्तिक असते. काळसेकरांची रोजनिशी ही चौफेर वाचनाची जमापुंजी मोजू बघणारी बौद्धिक निर्वाहाची रोजंदारी आहे. उदरनिर्वाही कामकाजांमुळे थकवा जाणवत राहतो. या ठिकाणी मात्र नेमकं उलट आहे. या वाचनप्रक्रियेच्या कामामुळे मन व बुद्धी थकत तर नाहीच; उलट अधिकाधिक टवटवीत होत राहते.

या रोजनिशीमध्ये कुठेही बडेजाव नाही. समीक्षकी विवेचन नाही. साध्या सरळ निवेदनाचं कवित्व त्यात जरूर आहे. मात्र कवितेच्या भाषेतील 'कविवर्य काळसेकर त्यात कुठेच दिसत नाहीत. केवळ 'वाचकवर्य' काळसेकर यांची सार्वभौम उपस्थिती प्रकर्षानं जाणवत राहते. शिवाय ही रोजनिशी लिहिणारा 'मी' म्हणजेच वाचणारा प्रत्येकजण असं समीकरण झाल्यानं हे पुस्तक वाचताना प्रत्येकाच्या मनात त्याने वाचलेल्या पुस्तकांची पानं उमटत जातात.

**या रोजनिशीमध्ये कुठेही बडेजाव नाही. समीक्षकी विवेचन नाही. साध्या सरळ निवेदनाचं कवित्व त्यात जरूर आहे. मात्र कवितेच्या भाषेतील 'कविवर्य काळसेकर त्यात कुठेच दिसत नाहीत. केवळ 'वाचकवर्य' काळसेकर यांची सार्वभौम उपस्थिती प्रकर्षानं जाणवत राहते. शिवाय ही रोजनिशी लिहिणारा 'मी' म्हणजेच वाचणारा प्रत्येकजण असं समीकरण झाल्यानं हे पुस्तक वाचताना प्रत्येकाच्या मनात त्याने वाचलेल्या पुस्तकांची पानं उमटत जातात.जमाखर्चाचा हिशेब मांडणारी प्रत्येकाची एक उदरनिर्वाहाची दैनंदिनी असते. ती वैयक्तिक असते. काळसेकरांची रोजनिशी ही चौफेर वाचनाची जमापुंजी मोजू बघणारी बौद्धिक निर्वाहाची रोजंदारी आहे.**

श्वास घेतल्याने माणूस जिवंत राहतो. जगणं जगण्यासाठी वास महत्त्वाचा. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा. त्या भागविण्यासाठी मनुष्य उदरनिर्वाहाची साधनं शोधतो. हल्ली शिक्षण व आरोग्याची तरतूद सुद्धा विचारात घेतो. शिवाय अनावश्यक भौतिक सुखांसाठी कमावण्याची व्याप्ती वाढवतो. मात्र समाधान हरवून बसतो. पोटापाण्यासाठी हे सारं काही ठीकठाक; पण मनाची नि बुद्धीची भूक भागवायची तर 'वाचन' हे प्रमुख साधनांपैकी एक. उदरनिर्वाहाची साधनं माणसांना जिवंत ठेवतात. बौद्धिक निर्वाहाची साधनं माणसाला जगणं शिकवतात.

काळसेकरांचं वाचनवेड असंच. ग्रंथवाचनासाठी अनेक पुनर्जन्म मिळावेत, अशी निरागस इच्छा ते सांगून जातात. का वाचावं? काय वाचावं? कसं वाचावं? कधी वाचावं? या प्रश्नांची ज्याची त्याची उत्तरं ज्याला त्याला शोधायची असतील. तर ज्यानं त्यानं ही रोजनिशी ज्याच्या त्याच्या वाचन कसोटीवर घासून घेणं क्रमप्राप्त आहे.

काळसेकर वाचनाचे दोन प्रकार सांगतात. हेतूपूर्वक कामानिमित्त कराव्या लागणाऱ्या वाचनात, त्याचा एक ताण असतो. मात्र स्वत:च्या आवडीप्रमाणे होणाऱ्या वाचनात अधिक आनंद व मोकळेपणा असतो, हे ते दोन प्रकार. असे असले तरी दोन्ही प्रकारांच्या वाचनात काहीतरी 'अफलातून' सापडण्याचे योग मात्र हमखास असल्यानं दोन्ही प्रकारचं वाचन ते करीत राहतात.

त्यांचं अफाट वाचन वाचकाला पानोपानी दिसत राहतं; पान पान उलटवताना उलगडत जातं. हे वाचन, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांतून आहे. कविता, कादंबरी, कथा, ललितबंध, निबंध, लेख, चरित्र, आत्मचरित्र, गौरवग्रंथ, संदर्भग्रंथ, प्रवासवर्णनं, वाचनविषयक मुलाखती, भाषणं नि समीक्षा असा हा वाचनाचा प्रचंड पसारा आहे.

त्याचबरोबर मराठी, हिंदी आणि इंग्रजीतील वाङ्मयीन नियतकालिकं, अनियतकालिकं, दिवाळी अंक, वृत्तपत्रीय लेख आणि स्तंभ असा वलय पिसारा आहे.

संत वाङ्मयापासून ते इतिहास, विज्ञान, चित्रकला, शिल्पकला, संगीत, नाटक, चित्रपट हे सारे विषय असासुद्धा एकंदरीत अवाका आहे.

शिवाय देश व जागतिक पातळीवरच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक जडणघडणीला समजावून घेण्याची जिज्ञासा आहे.

'इंग्रजी चांगली समजते असा माझा दावा नाही', हे

त्यांनी प्रांजळपणे कबूल केलं आहे. मात्र जिद्दीच्या जोरावर शब्दकोशाच्या साहाय्याने इंग्रजी व इंग्रजी भाषेत अनुवादित जागतिक महत्त्वाची पुस्तकं त्यांनी वाचून काढली आहेत. म्हणूनच सुरुवातीच्या काळातील अडचणीचा शब्द पार करण्यासाठीची त्यांची 'शोध यातना' वाचकाला अंतर्मुख करते. परभाषेतलं वाचन टाळणाऱ्याला दिशा देते.

ग्रंथ वाचनाबरोबरच वाङ्मयीन नियतकालिकांवरची नि अनियतकालिकांवरची त्यांची आपुलकी या नोंदीमध्ये प्रकर्षानं जाणवत राहते. वेळोवेळी त्यांतून येणाऱ्या महत्त्वाच्या साहित्याबद्दल ते वाचकांना अवगत करतातच. शिवाय अशा नियतकालिकांतून त्यांना आवडलेल्या नवागताच्या चांगल्या वाङ्मयकृतीचा देखील ते आवर्जून उल्लेख करतात. भविष्याचा वेध, वर्तमानाची घुसळण नि भूतकाळाचा ठेवा असं तिहेरी व्यक्तिमत्त्व या वाङ्मयीन नियतकालिकांत भरून राहिलेलं. मात्र त्यांचा खिसा रिकामा. निव्वळ पदरमोड, त्यामुळंच ही वाङ्मयीन नियतकालिकं जगली पाहिजेत, या ध्यासानं ते वाचकांना वर्गणी-देणगीचं आवाहन करतात.

सृजनतेची अवतरणं देणं, महत्त्वाच्या वाटलेल्या उताऱ्यांना प्रकट करणं, मग स्वत:ला आलेला वाचनानंद संदर्भ देत देत वाचकाला वाटत राहणं, त्यातून ते पुस्तक वा तशा तब्येतीचं पुस्तक वाचण्यासाठी वाचकाला प्रवृत्त करणं... आणि हे सगळं अगदी मित्रत्वाच्या नात्यानं नि खांद्यावर हात ठेवून आपुलकीच्या गप्पागोष्टी केल्यासारखं. या लेखनशैलीमुळं वाचकमित्र अधिकच गुंगून जातो.

ग्रंथ हे जसे मित्र, तसे मित्रसुद्धा ग्रंथ. अशा ग्रंथप्रेमी मित्रांचं ऋणदेखील काळसेकरांनी संदर्भासंदर्भानं व्यक्त केलेलं आहे. समछंदी मित्रांमुळे आयुष्य आणखीनच वाचनीय होत आहे ही भावना त्यांनी प्रकट केली आहे. ग्रंथवाचन प्रक्रियेतील देवाणघेवाण, वादसंवाद यांतून वृद्धिंगत होत असलेलं समाधान नि वाढत जाणारा मित्रपरिवार अशा दुहेरी लाभानं जगणं अधिकच समृद्ध होत असल्याची तृप्ती उत्कटतेनं व्यक्त झालेली आहे.

नोव्हेंबर २००४ च्या नोंदीमध्ये 'ए पॅशन फॉर बुक्स' या ग्रंथाबद्दल विवेचन आहे. या ग्रंथात असलेल्या एका थेट काळजाला हात घालणाऱ्या लेखाचा उल्लेख आला आहे. जॉर्ज हॅम्लिन फिच या लेखकानं त्याच्या मुलाच्या अकाली निधनानंतर लिहिलेला. 'कंफर्ट फाऊंड इन गुड ओल्ड बुक्स' या शीर्षकाचा. काळसेकर लिहून जातात, 'हा ग्रंथ मिळवून वाचावा. तुमच्या सुखदु:खाच्या काळात खरं तर दु:खाच्याच - ग्रंथवेड्याचे हे लेखन तुम्हांला आधारासारखे व्हावे.' ही नोंद २००४ सालची आहे. मात्र आज वाचताना डोळ्यांच्या कडा ओल्या होतात. ऋत्विक काळसेकर समोर दिसू लागतात.

या रोजनिशीच्या एकंदर पाच वर्षांच्या कालावधीत काळसेकर यांनी एकूण १९० पुस्तकं वाचली आहेत. मराठी, हिंदी, इंग्रजीबरोबरच इतर भाषांतील जागतिक साहित्याच्या मराठी, हिंदी आणि इंग्रजी अनुवादांचा त्यांत सामावेश आहे. ढोबळमानानं वर्गवारी करावयाची झाल्यास ४६ कादंबऱ्या, ३९ चरित्रं-आत्मचरित्रं आणि आठवणींची पुस्तकं, १० गौरवग्रंथ, १८ कवितासंग्रह आणि ९ कथासंग्रह अशा एकूण १२२ पुस्तकांचा उल्लेख करता येईल. उर्वरीत ६८ पुस्तकं ही ललितबंध, निबंध, लेख, भाषणं, मुलाखती, प्रवासवर्णनं, समीक्षा, संदर्भग्रंथ, ग्रंथविषयक ग्रंथ, इतिहास, विज्ञान, अर्थ, कलाविषयक अशा स्वरूपाची आहेत.

उपरोक्तप्रमाणे त्यांच्या विविधांगी वाचनाच्या एकूण गोषवाऱ्याकडे नजर टाकली असता त्यांच्या आवडीचा एकंदरीत कल लक्षात येतो. कादंबऱ्यांचे प्रमाण एकूण वाचनाच्या २४ टक्के तसेच चरित्र-आत्मचरित्र- आठवणी-गौरवग्रंथ या स्वरूपाच्या ग्रंथवाचनाचे प्रमाण २६ टक्के ठरते.

**मनाची नि बुद्धीची भूक भागवायची तर 'वाचन' हे प्रमुख साधनांपैकी एक. उदरनिर्वाहाची साधनं माणसांना जिवंत ठेवतात. बौद्धिक निर्वाहाची साधनं माणसाला जगणं शिकवतात. काळसेकरांचं वाचनवेड असंच. ग्रंथवाचनासाठी अनेक पुनर्जन्म मिळावेत, अशी निरागस इच्छा ते सांगून जातात. का वाचावं? काय वाचावं? कसं वाचावं? कधी वाचावं? या प्रश्नांची ज्याची त्याची उत्तरं ज्याला त्याला शोधायची असतील. तर ज्यानं त्यानं ही रोजनिशी ज्याच्या त्याच्या वाचन कसोटीवर घासून घेणं क्रमप्राप्त आहे.**